नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे | Year - 4rd
अंक - ९४ | Issue - 94
वार - शुक्रवार दि. २८ ऑगस्ट २०२६ | Blow- Friday Date 28 AUGUST 2026
ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com
वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com
पाने - ४ | Pages - 4
किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs
पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# नेपाळ महाप्रलय; ३६५ जणांचा मृत्यू, २८८ भारतीय बेपत्ता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

काठमांडू : बुधवारी सकाळी नेपाळ-तिबेट सीमेवर आलेल्या अचानक आलेल्या पुराच्या तडाख्यानंतर आतापर्यंत २८९ मृतदेह सापडले आहेत. सुमारे १५०० लोक अजूनही बेपत्ता आहेत. बेपत्ता झालेल्यांमध्ये नेपाळी नागरिकांसोबतच मोठ्या संख्येने परदेशी नागरिकांचाही समावेश आहे. नेपाळमध्ये लष्कर, पोलीस आणि सशस्त्र पोलीस पथके बेपत्ता झालेल्यांचा सतत शोध घेत आहेत. पूरग्रस्त भागात अडकलेल्या लोकांना हेलिकॉप्टर आणि इतर साधनांनी बाहेर काढले जात आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाच्या माहितीनुसार, नेपाळमधील २८८ भारतीय नागरिकांशी अजूनही संपर्क झालेला नाही. यापैकी ७३ जण त्रिशुली-१ वीज प्रकल्पात काम करतात. पुरात अडकलेल्या २१ भारतीयांना सुखरूप बाहेर काढण्यात आले असून, त्यापैकी ११ जणांची ओळख पटली आहे.

**भूस्खलनाचा धक्का ५.२ तीव्रतेच्या भूकंपासारखा**

नेपाळ-चीन सीमेजवळ भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. यूएस जिओलॉजिकल सर्व्हेने सुरुवातीला हा ४.४ तीव्रतेचा भूकंप असल्याचे सांगितले. पण नंतर असे आढळून आले की, बर्फ आणि खडकांसह पर्वताचा एक मोठा भाग ल्हेंडे खोला नदीत कोसळला होता. ल्हेंडे खोला ही भोटेकोशी नदीची उपनदी आहे, जी चीनमध्ये उगम पावते आणि नेपाळमध्ये प्रवेश करते. यूएसजीएसने नंतर स्पष्ट केले की, ५.२ तीव्रतेचा हा भूकंप भूस्खलनामुळे झाला होता.

**नेपाळमधील ८ जिल्ह्यांतून २८९ मृतदेह बाहेर काढले**

नेपाळमधील रसुवाजवळ त्रिशुली नदीला आलेल्या महापुरानंतर, आतापर्यंत ८ जिल्ह्यांतून २८९ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. ही आकडेवारी दुपारी ३ वाजेपर्यंतची आहे. चितवनमध्ये सर्वाधिक १२१ मृतदेह सापडले आहेत. त्याखालोखाल पूर्व नवलपरासी (६५), धादिंग आणि गोरखा (प्रत्येकी २९), तनहुन (१६), नुवाकोट (१२), पश्चिम नवलपरासी (१४) आणि रसुवा (३) यांचा क्रमांक लागतो.

**भारत नेपाळला बेली ब्रिज पाठवणार**

पुरामुळे खराब झालेले रस्ते आणि पूल दुरुस्त करण्यासाठी भारत नेपाळला बेली ब्रिज पाठवणार आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या माहितीनुसार, हा एक पोर्टेबल आणि पूर्वनिर्मित पूल आहे, जो आवश्यक ठिकाणी त्वरित उभारला जाऊ शकतो. जेव्हा पूर किंवा भूस्खलनामुळे पूल उद्ध्वस्त होतो, तेव्हा बेली ब्रिज रस्त्यांची जोडणी त्वरित पूर्ववत करण्यास मदत करतो. गरजेनुसार तो हलवून पुन्हा स्थापितही केला जाऊ शकतो.

**त्रिशुलीमध्ये हेलिकॉप्टरद्वारे बचाव आणि मदत कार्य सुरूच**

पुराच्या पार्श्वभूमीवर नेपाळच्या त्रिशुली प्रदेशात मदत आणि बचाव कार्य तीव्र झाले आहे. खराब झालेले रस्ते आणि इतर मार्गांमुळे अडकलेल्या लोकांना हेलिकॉप्टरद्वारे बाहेर काढले जात आहे. बचावलेल्या लोकांना हेलिकॉप्टरद्वारे त्रिशुली बाजारात नेले जात आहे. लष्करी आणि खाजगी हेलिकॉप्टरच्या मदतीने आतापर्यंत १०० हून अधिक लोकांना पूरग्रस्त भागातून बाहेर काढण्यात आले आहे.

## प्रशिक्षणार्थी विमान कोसळले, वैमानिक आणि प्रशिक्षणार्थी मृत्यूमुखी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कानपूर : उत्तर प्रदेशातील कानपूर येथे एक प्रशिक्षण विमान कोसळले. या अपघातात वैमानिक आणि प्रशिक्षणार्थी यांचा मृत्यू झाला. आज (२७ ऑगस्ट) विमानाने उड्डाण केले आणि उड्डाणानंतर अवघ्या २० मिनिटांतच, सकाळी पावणे बारा वाजता गंगा बॅरेजजवळ ते कोसळले. प्रत्यक्षदर्शींच्या मते, विमान समुद्रसपाटीपासून अंदाजे २५० फूट उंचीवर असताना हवेत अचानक डगमगले आणि नंतर खाली कोसळले. संपूर्ण विमानाचे तुकडे तुकडे झाले आणि त्याचे भाग दूरवर विखुरले गेले. मात्र, विमानाला आग लागली नाही.

अपघाताच्या व्हिडिओमध्ये विमान पूर्णपणे उद्ध्वस्त झालेले दिसत आहे. एक वैमानिक कॉकपिटजवळ अडकला. दुसरा वैमानिक विमानापासून थोड्या अंतरावर रक्ताच्या थारोळ्यात गंभीर अवस्थेत पडला. विमानातील एक आसनही तुटून पडले होते. पोलीस आणि प्रशासकीय पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी रक्ताने माखलेले पायलट सचिन भाटिया (गुजरात) आणि प्रशिक्षणार्थी अभिषेक पुजारी (कर्नाटक) यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले, जिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. घटनास्थळी पोहोचलेले कानपूरचे पोलीस आयुक्त रघुबीर लाल म्हणाले, विमानाने चकेरी येथील गर्ग एव्हिएशन ट्रेनिंग सेंटरमधून उड्डाण केले आणि २० मिनिटांनंतर ३९ किलोमीटर अंतरावर ते कोसळले. पायलटला ३ हजार तासांचा उड्डाणाचा अनुभव होता. नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयाला माहिती देण्यात आली आहे. त्यांचे पथक आता तपास करेल. कानपूरच्या आयुक्तांनी सांगितले की, पायलट सचिन भाटिया यांना ३ हजार तासांचा उड्डाणाचा अनुभव होता. तज्ज्ञांच्या मते, हवाई वाहतूक क्षेत्रात इतक्या जास्त तासांचा उड्डाणाचा अनुभव अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. हा अपघात कसा घडला याची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. डॉक्टरांच्या मते, उंचीवरून पडल्यामुळे दोन्ही पायलटांचा मृत्यू झाल्याचे दिसते. त्यांना अनेक जखमा झाल्या आहेत. मात्र, नेमके कारण शवविच्छेदन अहवालात उघड होईल.



## संपादकीय....

# पुरामुळे जीवितहानी

नेपाळमध्ये आलेल्या अचानक भीषण पुरामुळे मोठी हानी झाली आहे. या जलप्रलयामुळे इमारती, गावच्या गावं, रस्ते आणि पूल वाहून गेले आहेत. या पुरात आतापर्यंत १६५ जणांचा मृत्यू झाला असून १००० हून अधिक लोक बेपत्ता आहेत. बचाव आणि मदतकार्य सुरू आहे. तज्ज्ञांच्या मते, नेपाळमध्ये आलेल्या या पुरामागे भूकंप नसून ग्लेशियरचा मोठा भाग उंचावरून कोसळणे हे प्रमुख कारण आहे. मात्र, चीनने ग्लेशियर तुटण्यामागे नेपाळमध्ये झालेल्या भूकंपाला जबाबदार धरले आहे. नेपाळमधील चीनचे राजदूत झांग माओमिंग यांनी रसुवा येथे आलेल्या भीषण पुराबाबत नेपाळच्या एका वृत्तवाहिनीशी संवाद साधला. त्यांनी सांगितले की, या कठीण काळात चीन नेपाळसोबत ठामपणे उभा आहे. उपलब्ध प्राथमिक माहितीनुसार, नेपाळच्या बाजूला भूकंप झाला. त्यानंतर बर्फाचा हिमस्खलन झाला आणि पुढे भूस्खलन झाले. यामुळे ग्यिरोंग-रसुवागढी सीमावर्ती भागातील नेपाळ आणि चीन या दोन्ही बाजूंना मोठी जीवितहानी झाली असून अनेक जण बेपत्ता आहेत. लँगटांग लिरुंग पर्वताच्या उत्तर उतारावर सुमारे ५२०० मीटर उंचीवर असलेल्या ग्लेशियरचा खालचा भाग तुटून सुमारे १२०० मीटर खाली दरीत कोसळला. त्यामुळे ल्हेंदे खोला नदीत जाऊन पडल्याने नदीचा प्रवाह अडला आणि तिथे तात्पुरता बांध तयार झाला. हा बांध फुटल्यानंतर पाणी, चिखल, दगड आणि मोठ्या प्रमाणात मलब्याची प्रचंड लाट वेगाने खालीच्या दिशेने वाहू लागली. ल्हेंदे खोला ही तिबेटमधून वाहत येणारी एक उपनदी असून, ती नेपाळ-चीन सीमेवरील रसुवागढी आणि तिमुरे परिसरात भोटेकोशी नदीला मिळते. ग्लेशियर कोसळल्याने किंवा आइस-रॉक एव्हलांच झाल्याने मोठ्या प्रमाणात बर्फ, दगड आणि मलबा ल्हेंदे खोलामध्ये कोसळला. त्यामुळे नदीच्या प्रवाहात अचानक प्रचंड वाढ झाली. पुराचे पाणी आणि मलबा सर्वप्रथम भोटेकोशी नदीत पोहोचले. भोटेकोशी नदी तिबेटमधून नेपाळमध्ये प्रवेश करते आणि रसुवा जिल्ह्यातून वाहते. तिमुरे परिसरातून पुराचे पाणी भोटेकोशी नदीच्या प्रवाहासोबत पुढे गेले. पुढे भोटेकोशी नदी त्रिशूली नदीला मिळते. त्यामुळे पुराचे पाणी त्रिशूली नदीतही पोहोचले आणि नुवाकोट, धादिंग यांसारख्या खालच्या भागांमध्येही पसरले. त्रिशूली नदीची पाणीपातळी काही ठिकाणी अवघ्या ३० मिनिटांत ७ ते ९ मीटरने वाढली होती. प्लॅनेट लॅब्सने पुरापूर्वी आणि पुरानंतरची सॅटेलाइट छायाचित्रे शेअर केली होती. त्यामध्ये केलेल्या प्राथमिक अभ्यासातूनही असे समोर आले की, बर्फ आणि दगडांच्या भूस्खलनामुळे ल्हेंदे नदीत मलब्याने भरलेला पूर आला. नेपाळच्या राष्ट्रीय आपत्ती जोखीम न्यूनीकरण आणि व्यवस्थापन प्राधिकरणाने एक व्हिडीओ शेअर करताना म्हटले की, प्लॅनेट लॅब्सच्या सॅटेलाइट छायाचित्रांच्या विश्लेषणावर आधारित प्राथमिक अभ्यासातून असे दिसून आले आहे की, नेपाळ-चीन सीमेवरील रसुवागढी बॉर्डर क्रॉसिंगपासून सुमारे २० किलोमीटर ईशान्येला बर्फ आणि दगडांचे भूस्खलन झाल्याने ल्हेंदे नदीत ग्लेशियरशी संबंधित पूर आला.

### २६ ऑगस्ट ते ०१ सप्टेंबर: गडचिरोली जिल्हा निर्मिती दिन सप्ताह

# स्वतंत्र गडचिरोली जिल्हा अस्तित्वात, मात्र नावालाच

गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती २६ आगस्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून झाली. संपूर्ण गडचिरोली जिल्हा हा पूर्वी चंद्रपूर जिल्ह्यामध्ये समाविष्ट होता व मुख्यतः गडचिरोली, सिरोंचा ही ठिकाणे चंद्रपूर जिल्ह्यामध्ये तहसील म्हणून कार्यरत होती. गडचिरोली जिल्ह्याचे एकुण क्षेत्रफळ १४४१२ चौ.कि.मी.आहे. सदर संकलित ज्ञानवर्धक माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी प्रस्तुत करताहेत... संपादक.

चंद्रपूर व ब्रम्हपुरी मधील जमिनदारी व मालमत्तेचे हस्तांतरण करून गडचिरोली तहसील म्हणून १९०५ पासून अस्तित्वात होती. ब्रम्हपुरी ऐवजी गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती २६ आगस्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून करण्यात आली आहे. गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ या प्रदेशात मोडतो. फार प्राचीन काळी ह्या प्रदेशावर राष्ट्रकुट यांचे राज्य होते. त्यानंतर चालुक्य, देवगीरीचे यादव यांचे साम्राज्य होते. यानंतर गडचिरोलीच्या गोंड राजांनी राज्य केले. तेराव्या शतकात, खन्डक्या बल्लाळ शाह यांनी चंद्रपूरची स्थापना केली. त्यांनी आपली राजधानी सिरपूर येथून चंद्रपूर येथे हलविली. याचकाळात चंद्रपूर प्रदेश हा मराठ्याच्या सत्तेखाली आला. सन १८५३ मध्ये, बेरार हा चंद्रपूर (पूर्वीचे चांदा ) प्रदेशाचा भाग ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनी च्या ताब्यात आला. सन १८५४ मध्ये चंद्रपूर हा बेरार या प्रदेशाचा स्वतंत्र जिल्हा म्हणून अस्तित्वात आला. ब्रिटीशांनी सन १९०५ मध्ये चंद्रपूर व ब्राम्हपुरीची जमिनदारी व मालमत्ता हस्तांतरण करून गडचिरोली तहसीलची निर्मिती केली. राज्याची पुनर्ररचना होण्यापुर्वी हा भाग सन १९५६ पर्यंत केंद्रीय अधिपत्याखाली होता. त्यानंतर राज्य पुनर्रचनेनुसार चंद्रपूर बॉम्बे स्टेट मध्ये समाविष्ट करण्यात आले. सन १९६० मध्ये केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याची स्थापना करून त्यामध्ये चंद्रपूर हे जिल्हा म्हणून समाविष्ट करण्यात आले. सन १९८२ मध्ये चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून ब्रम्हपुरी ऐवजी स्वतंत्र गडचिरोली जिल्हा अस्तित्वात आला.

गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या उत्तर-पूर्व दिशेला वसलेला असून तेलंगणा व छत्तीसगड राज्याच्या सीमा लागून आहेत. गडचिरोली जिल्हा हा पूर्णपणे नक्सल प्रभावित जिल्हा म्हणून ओळखला जातो. गडचिरोली जिल्हा जवळपास ७६ % जंगलाने व्यापलेला असल्याने घनदाट जंगलात नक्सल समर्थित लोक आश्रय घेतात. सन २०११ च्या जनगणने नुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १०७२९४२ असून पुरुष व स्त्रिया यांची लोकसंख्या अनुक्रमे ५४१३२८, ५३१६१४ याप्रमाणे आहे जिल्ह्यात अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्या अनुक्रमे १२०७४५ व ४१५३०६ एवढी आहे. जिल्ह्याची एकूण साक्षरता ७४.४ टक्के आहे. जिल्ह्यामध्ये अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्येची टक्केवारी ११.२५ % व ३८.७ % अनुक्रमे आहे.

गडचिरोली जिल्हा हा मुख्यत्वे महाराष्ट्र राज्यात आदिवासी, मागासलेला व घनदाट जंगलाने व्याप्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. हा जिल्हा अतिदुर्गम, डोंगर द-याने व्याप्त व अविकसित असून जास्तीत जास्त क्षेत्र जंगलाने वेढलेला आहे. जिल्ह्याच्या एकूण जमिनीच्या क्षेत्रापैकी जवळपास ७६ % टक्के भाग जंगलाने व्याप्त आहे. हा जिल्हा बांबुचे झाड व तेंदूची पाने यांकरीता प्रसिद्ध आहे. भात हे जिल्ह्याचे मुख्य पिक आहे. याव्यतिरिक्त तूर, गहू, ज्वारी, सोयाबीन, जवस इत्यादी कृषी उत्पादने घेतली जातात. जिल्ह्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे.

जिल्ह्यात चामोर्शी तालुक्यामध्ये आष्टी येथे पेपर मिल चा कारखाना असून इतर कोणतेही मोठे उद्योगधंदे नाहित. यामुळे, जिल्हा हा आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. जिल्ह्यात भाताचे उत्पादन जास्त होत असल्याने भात गिरणींची संख्या जास्त आहे. जिल्ह्यात कोसाचे उत्पादन होत असून कोसा उत्पादन केंद्र आरमोरी येथे आहे. जिल्ह्यात फक्त १८.५ कि.मी. लांबीचा रेल्वे मार्ग असून देसाईगंज येथे रेल्वेची सुविधा आहे. सद्या इतरत्र रेल्वे लाईन टाकण्याची प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू आहे.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये मुख्यतः गोंडी, माडिया, मराठी, हिंदी, तेलगु, बंगाली, छत्तीसगडी इत्यादी भाषा बोलल्या जातात. गडचिरोली जिल्ह्यामध्ये शासनाने प्रशासकीयदृष्ट्या एकूण सहा उपविभाग- गडचिरोली, वडसा, अहेरी, चामोर्शी, एटापल्ली, कुरखेडा निर्माण केले असुन प्रत्येक उपविभागात दोन तालुके सामाविष्ट करण्यात आलेले आहेत. जिल्ह्यात एकूण १२ तालुके आहेत. जिल्ह्यात ४५७ ग्रामपंचायती असून १६८८ राजस्व गावे अस्तित्वात आहेत. जिल्ह्यामध्ये तीन विधानसभा व एक लोकसभा क्षेत्र- चंद्रपूर जिल्ह्याचा काही भाग मिळून अहे. सद्या १२ पंचायत समीती आहेत. जिल्ह्यात ९ नगर पंचायती असून गडचिरोली, देसाईगंज (वडसा) व आरमोरी या शहरात नगरपालिका आहेत.

गोदावरी नदी पश्चिमेकडून पूर्वे कडे वाहत असून तिचे पात्र जिल्ह्याच्या सीमेला लागून असून दक्षिण भागाला जिल्हा वसलेला आहे. गोदावरी नदीच्या उपनद्या जसे प्राणहिता (वैनगंगा व वर्धा या उपनद्या मिळून) व इंद्रावती ह्या मुख्य नद्या जिल्ह्याच्या सीमा भागात वाहतात. जिल्ह्याचे पूर्वेत्तर भागात, धानोरा, एटापल्ली, अहेरी व सिरोंचा तालुके असून घनदाट जंगलाने व्याप्त आहे. जिल्ह्याच्या भामरागड, टिपागड, पलसगड व सुरजागड भागात उंच टेकड्या आहेत. नामांकित कंपन्या तेथील खनिज माल उत्खनन करून काढण्याच्या प्रयत्नात आहेत. शेतकऱ्यांच्या सुपीक जमीनी हडपून उद्योगधंदे आणि कारखाने स्थापन करण्याची त्यांच्यात होड लागलेल्या दिसून येत आहेत.

चंद्रपूर जिल्याचे विभाजन हऊन दिनांक २६.०८.१९८२ पासून गडचिरोली जिल्हा परिषद अस्तित्वात आली. याशिवाय परिषदेच्या अधिकार क्षेत्रातील ऐकूण १२ (बारा) पंचायत समित्या आहेत. पंचायत समित्यांची नावे अनुक्रमे- १) गडचिरोली २) आरमोरी ३) कुरखेडा ४) धानोरा ५) चामोर्शी ६) अहेरी ७) एटापल्ली ८) सिरोंचा ९) भामरागड १०) मुलचेरा ११) कोरची आणि १२) देसाईगंज ही आहेत. जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रात एकूण ४६७ ग्रामपंचायती असून ९६ स्वतंत्र ग्रामपंचायत व ३७१ गट ग्रामपंचायत आहेत. जिल्ह्यातील एकूण खेड्यांची संख्या १,६८० आहे. एकूण लोकसंख्ये पैकी ३,७१,६९६ लोकसंख्या अनुजमातीची आहे तसेच अनुसूचित जातीची लोकसंख्या १,०८,८२४ आहे. जिल्ह्याच्या उत्तरेला भंडारा जिल्हा, पूर्वेला छत्तीसगड राज्यातील राजनांदगाव आणि बस्तर जिल्हे, दक्षिणेला आंध्र प्रदेशातील करीमनगर आणि आदिलाबाद जिल्हे आणि पश्चिमेला चंद्रपूर जिल्हा आहे. वैनगंगा ही या जिल्ह्याची प्रमुख नदी असून ती जिल्ह्याच्या पश्चिम दिशेकडून वाहते व तिची जिल्ह्याची सीमारेषा आहे.

गडचिरोली जिल्ह्यात गोंडी, माडिया, मराठी, हिंदी, तेलुगू, बंगाली, छत्तीसगढी या सात भाषा बोलल्या जातात. या जिल्ह्यात लोह, चुनखडी, अभ्रक याचे साठे विपुल प्रमाणात आहे. वाहतुकीच्या दृष्टीने बारमाही रस्ते उपलब्ध नसल्यामुळे उद्योग धंद्याच्या बाबतीत जिल्हा मागासलेला आहे. आरमोरी येथे कोसा उद्योगकेंद्र आहे. वैरागड येथे ऐतिहासिक किल्ला आहे. भंडारेश्वर व गोरजाईचे हेमांडपंथी देवालय आहेत.

जिल्ह्यातील देसाईगंज (वडसा) येथे एकमेव रेल्वेस्थानक असल्यामुळे ते व्यापाराचे केंद्र बनले आहे. तसेच येथे वाळू, माता संगोपन केंद्र आहे. येथे कागद कारखाना देखील आहे. कुरखेडा येथे गुरांची मोठी बाजारपेठ आहे. या तालुक्यातील खोब्रामेंढा रमनीय क्षेत्र असून येथे हनुमानाची भव्य मूर्ती आहे. चामोर्शी तालुक्यातील मार्कंडदेव येथे अतीप्राचीन मार्कंडेश्वर देवालय आहे. या ठिकाणावर वैनगंगा नदी उत्तरवाहिनी असून येथे मोठी यात्रा भरते. याच तालुक्यात चपराळा हे ठिकाण प्राणहिता नदीच्या काठावर असून याला प्रशांतधाम असेही म्हणतात. महाशिवरात्रीला येथेही मोठी यात्रा भरते. येथील अभयारण्य प्रसिद्ध आहे. आष्टी येथे कागद कारखाना आहे.

अहेरी तालुक्यातील आलापल्ली परिसरातील वनश्री पाहण्यासारखी आहे. येथील सागाचे लाकूड उत्तम प्रतीचे आहे. वनखात्याचा लाकूडकटाई कारखाना येथे आहे. एटापल्ली भागात सौर ऊर्जेवरील दिव्यांचा वापर केला जातो. येथे सौर ऊर्जेसाठी स्तंभ उभारण्यात आलेला आहे. भामरागड तालुक्यात हेमलकसा येथे आदिवासींसाठी लोकबिरादरी केंद्र व आश्रम आहे. आश्रमातील प्राणी संग्रालय पाहण्यासारखे आहे. तसेच पर्लकोटा, पामुलगौतम व इंद्रवती या नद्यांचे त्रिवेणी संगमसुद्धा आहे.

जिल्हा परिषद ही ग्रामीण विकासाची धार आहे. या जिल्ह्यामध्ये प्रत्येक लहान गावात विकासाची बोली लावण्यात आली असून केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची माहिती विविध माध्यमांतून ग्रामीण भागात पोहोचवून योजनांची अंमलबजावणी तीव्रतेने केली जाते, ज्यामुळे जिल्ह्याचा विकास होत आहे. या जिल्ह्याचे क्षेत्रफळ १५,४३३.३८ चौ.कि.मी असून त्यापैकी १३,७०८ चौ.कि.मी वनांखाली आहे. जिल्ह्याच्या उत्तर दक्षिण सीमा वैनगंगा खेऱ्यात मोडतात. जिल्ह्यात १६१३ जिल्हा परिषदेचे माजी मालगुजारी तलाव व १७ लघु पाटबंधारे तलाव १६३० तलाव व ७८८८ सिंचन विहिरी आहेत. सरासरी पर्जन्यमान अधिक असल्यामुळे मुख्यत्वे करून धानाचे पिक घेण्यात येते. लोखांचे मुख्य व्यवसाय शेती असून मच्छिमारी, तेंदूपाने व गोंद गोळा करणे इत्यादी जोडधंदे आहेत.

गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती २६ ऑगस्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून करण्यात आली. जिल्हा गडचिरोली, महाराष्ट्र शासन नुसार, त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले होते. हा महाराष्ट्राचा एक प्रमुख आणि आदिवासी संस्कृतीने समृद्ध असलेला जिल्हा आहे. राज्य शासनाने याकडे अधिकाधिक लक्ष देऊन विकासकामे मार्गी लावण्याची नितांत गरज आहे. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !

!! ४४ व्या गडचिरोली जिल्हा वर्धापन दिनानिमित्त समस्त जिल्हावासीयांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

– संकलन व सुलेखन –

श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.

राह. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.

# राखीच्या धाग्यापलीकडचे बहिण-भावाचे नाते

रक्षाबंधन हा बहिण-भावाच्या नात्यातील प्रेम, जिव्हाळा, विश्वास आणि आपुलकी व्यक्त करण्याचा दिवस आहे. यंदा २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन साजरे होत आहे. या दिवसाकडे धार्मिक परंपरा किंवा कर्मकांडाच्या चौकटीतून न पाहता, मानवी नात्यांच्या भावविश्वातून पाहिले तर त्याचे महत्त्व अधिक व्यापकपणे जाणवते. बहिण आणि भाऊ हे नाते जन्मतः मिळते; परंतु त्यातील प्रेम, विश्वास आणि आपलेपणा आयुष्यभर जपावा लागतो. बालपणीच्या निरागस आठवणींपासून ते प्रौढ आयुष्यातील जबाबदाऱ्यांपर्यंत हे नाते अनेक अनुभवांतून समृद्ध होत जाते. कधी त्यात खोडकरपणा असतो, कधी भांडणे असतात, कधी रुसवे-फुगवे असतात, तर कधी कोणत्याही शब्दांशिवाय एकमेकांना समजून घेणारी विलक्षण जवळीक असते. म्हणूनच बहिण-भावाचे नाते हे केवळ रक्तसंबंध नसून भावनिक सोबतीचे आणि आयुष्यभर टिकणाऱ्या विश्वासाचे नाते आहे.

बहिण-भावाच्या नात्याची सुरुवात बहुतेकदा बालपणाच्या अंगणात होते. एकाच घरात वाढताना दोघांच्या आयुष्यातील असंख्य क्षण एकमेकांशी जोडलेले असतात. खेळताना झालेले भांडण, खाऊसाठी केलेली धावपळ, शाळेत जाण्याची लगबग, गृहपाठ टाळण्यासाठी केलेली कारणे, पालकांकडून मिळालेली कौतुकाची थाप आणि कधी झालेली रागाची बोलणी या सर्व आठवणी भावंडांच्या मनात साठत जातात. बालपणी एखादी छोटीशी वस्तू मिळाली नाही म्हणून झालेले भांडण त्या क्षणी मोठे वाटते; परंतु काही वेळाने तेच दोघे पुन्हा एकत्र खेळू लागतात. या छोट्या घटनांमधून नात्याचा एक महत्त्वाचा गुण दिसून येतो. मनात राग असला तरी मनात दुरावा कायम राहत नाही. बालपणातील हे सहज प्रेम पुढे आयुष्याच्या अनेक वळणांवर भावंडांना एकमेकांशी जोडून ठेवते.

बहिण-भावाच्या नात्यातील सर्वांत सुंदर गोष्ट म्हणजे त्यातील सहजता. या नात्यात स्वतःला वेगळे दाखवण्याची गरज नसते. आपली चूक, आपला राग, आपले दुःख, आपला आनंद किंवा आपली चिंता मनमोकळेपणाने व्यक्त करता येते. बाहेरच्या जगात प्रत्येक व्यक्तीला आपली प्रतिमा जपावी लागते; परंतु भावंडांसमोर ती प्रतिमा बाजूला ठेवून मनातील खरी भावना व्यक्त करता येते. बहीण भावाला त्याच्या चुका थेट सांगू शकते आणि भाऊही बहिणीला तिच्या निर्णयांबद्दल प्रामाणिक सल्ला देऊ शकतो. या मोकळेपणामुळे नाते अधिक घट्ट होते. अनेकदा आयुष्यातील एखाद्या कठीण प्रसंगी मित्रांपेक्षा आधी आठवण येते ती भावंडांची. कारण या नात्यात मदतीपूर्वीच विश्वास असतो.

बालपण मागे पडले की भावंडांच्या आयुष्यात बदल सुरू होतात. शिक्षणासाठी वेगवेगळ्या ठिकाणी जाणे, नोकरीसाठी शहर बदलणे, विवाहानंतर स्वतंत्र कुटुंब निर्माण करणे किंवा परदेशात स्थायिक होणे यामुळे एकत्र राहण्याचे दिवस संपतात. पूर्वी दररोज होणारा संवाद आता आठवड्यातून किंवा महिन्यातून एकदा होऊ शकतो. एकाच घरात वाढलेली भावंडे कधी कधी हजारो किलोमीटर अंतरावर राहू लागतात. मात्र भौगोलिक अंतर वाढले म्हणून भावनिक अंतर वाढायलाच हवे असे नाही. उलट, दूर गेल्यावर एकमेकांची आठवण अधिक तीव्र होते. बालपणीच्या आठवणी, कुटुंबातील प्रसंग आणि एकत्र घालवलेला काळ या आठवणी भावंडांना मनाने जोडून ठेवतात.

आजच्या वेगवान जीवनात प्रत्येक व्यक्ती आपल्या कामाच्या आणि वैयक्तिक जबाबदाऱ्यांच्या व्यापात अडकलेली आहे. अशा परिस्थितीत नाती जपण्यासाठी जाणीवपूर्वक वेळ देणे आवश्यक झाले आहे. बहिण-भावाच्या नात्यासाठी महागड्या भेटवस्तूंची गरज नाही. कधी अचानक केलेला दूरध्वनी, मनापासून विचारलेली विचारपूस, एखादा जुना प्रसंग आठवून केलेली गंमत किंवा संकटाच्या वेळी दिलेला धीर हे अधिक मौल्यवान असते. तू कसा आहेस?' किंवा तुला काही मदत हवी आहे का?' एवढे साधे शब्दही नात्याला आधार देतात. नात्याची किंमत भेटवस्तूच्या किमतीने ठरत नाही; ती एकमेकांना दिलेल्या वेळेने, समजून घेण्याच्या वृत्तीने आणि कठीण प्रसंगी दिलेल्या साथीने ठरते.

बहिण-भावाचे नाते आजच्या काळात समानतेच्या नव्या अर्थाने समजून घेण्याची गरज आहे. पूर्वी भावाची भूमिका केवळ बहिणीचे संरक्षण करणारा अशी मांडली जात असे. आज मात्र या नात्याचा अर्थ त्यापेक्षा व्यापक झाला आहे. बहीणही भावाच्या आयुष्यात तितकीच आधार देणारी व्यक्ती असते. भावाला अडचण आली तर बहीण त्याच्या पाठीशी उभी राहते आणि बहिणीसमोर संकट आले तर भाऊ तिच्यासोबत राहतो. ही साथ एकतर्फी नसून परस्परांची असली पाहिजे. प्रेमामध्ये अधिकार असू शकतो; परंतु नियंत्रण नसावे. काळजी असावी; परंतु बंधने नसावीत. सल्ला असावा; परंतु निर्णय लादण्याची वृत्ती नसावी. या समतोलातूनच आधुनिक बहिण-भावाचे नाते अधिक परिपक्व होऊ शकते.

विशेषतः बहिणीच्या शिक्षण, करिअर आणि स्वावलंबनाच्या वाटचालीत भावाची भूमिका महत्त्वाची ठरू शकते. बहिणीने काय शिकावे, कोणते काम करावे, कुठे राहावे किंवा कोणते निर्णय घ्यावेत यावर अधिकार गाजवण्याऐवजी तिच्या क्षमतेवर विश्वास ठेवणे ही खरी साथ आहे. तिच्या यशाचा आनंद स्वतःच्या यशासारखा मानणे आणि तिच्या अपयशाच्या वेळी तिला खंबीरपणे उभे करणे हे भावाच्या प्रेमाचे अधिक सुंदर रूप आहे. त्याचप्रमाणे भावाच्या आयुष्यातील संघर्ष, आर्थिक अडचणी, करिअरमधील चढ-उतार किंवा भावनिक ताण समजून घेऊन त्याला दोष न देता ऐकून घेणे ही बहिणीचीही महत्त्वाची भूमिका आहे. दोघांनीही एकमेकांना स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वीकारले पाहिजे.

बहिण-भावाच्या नात्यात संवादाला विशेष महत्त्व आहे. अनेक गैरसमज संवादाच्या अभावामुळे निर्माण होतात. तो स्वतःहून समजून घेईल' किंवा ती माझ्या मनातील भावना ओळखेल' असे गृहीत धरल्याने कधी कधी मनात अंतर वाढते. त्याऐवजी आपल्याला काय वाटते हे स्पष्टपणे सांगणे, समोरच्याचे म्हणणे शांतपणे ऐकणे आणि मतभेद झाले तरी नाते तोडण्याऐवजी संवाद कायम ठेवणे आवश्यक आहे. प्रत्येक भावंडाची जीवनशैली, विचारसरणी आणि निर्णय घेण्याची पद्धत वेगळी असू शकते. मतभिन्नता म्हणजे नात्यातील तुटलेपणा नव्हे. परस्परांच्या वेगळेपणाचा स्वीकार करणे हेच प्रगल्भ नात्याचे लक्षण आहे.

विवाहानंतर बहिणीचे आयुष्य अनेक बाबतींत बदलते. ती नव्या कुटुंबात प्रवेश करते, नवीन जबाबदाऱ्या स्वीकारते आणि अनेकदा वेगळ्या शहरात राहू लागते. अशा वेळी माहेरच्या भावंडांशी असलेले नाते तिच्यासाठी भावनिक आधार ठरू शकते. मात्र हा आधार तिच्या वैयक्तिक आयुष्यात अनावश्यक हस्तक्षेप करणारा नसावा. बहिणीच्या जीवनातील निर्णयांचा सन्मान करणे आणि तिच्या गरजेच्या वेळी तिच्या पाठीशी उभे राहणे अधिक महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे विवाहित बहिणीनेही भावाच्या आयुष्यातील बदल समजून घेत त्याच्या जबाबदाऱ्यांचा आदर केला पाहिजे. नात्यातील जवळीक टिकवायची असेल तर अधिकारापेक्षा समजूतदारपणाला महत्त्व द्यावे लागते.

भावंडांच्या नात्यात कधी आर्थिक मदतीची गरजही निर्माण होते. एखाद्या भावंडाला शिक्षणासाठी, व्यवसायासाठी किंवा अन्य जीवनप्रसंगी मदत लागते. अशा वेळी शक्य असेल तेव्हा मदतीचा हात पुढे करणे ही नात्याची ताकद आहे. मात्र आर्थिक व्यवहारांमुळे प्रेमाचे मोजमाप होऊ नये. कोणाने किती खर्च केला, कोणाने किती भेट दिली किंवा कोणाने किती मदत केली याची हिशेबपत्रिका नात्यात ठेवली तर भावनिक जवळीक कमी होऊ शकते. नात्याची श्रीमंती पैशांत नसते; ती विश्वासात असते. संकटाच्या वेळी तू एकटा नाहीस' किंवा तू एकटी नाहीस' हा दिलासा अनेकदा कोणत्याही आर्थिक मदतीपेक्षा मोठा आधार ठरतो.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने भावंडांनी आपल्या नात्याचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. वर्षभर व्यस्त राहिल्यानंतर या दिवशी भेटणे हा एक सुंदर योग असतो; परंतु त्यापलीकडे या दिवसाचा अर्थ अधिक मोठा आहे. एकमेकांशी मनमोकळेपणाने बोलणे, जुन्या आठवणींना उजाळा देणे, झालेल्या गैरसमजांवर पडदा टाकणे आणि भविष्यातील आयुष्यासाठी एकमेकांना प्रोत्साहन देणे हे या दिवसाचे खरे सौंदर्य ठरू शकते. राखी हा केवळ मनगटावर बांधला जाणारा धागा नसून भावनिक नात्याची आठवण करून देणारे प्रतीक आहे. त्या धाग्याला अर्थ प्राप्त होतो तो परस्परांच्या मनात असलेल्या प्रेमामुळे.

आज डिजिटल माध्यमांमुळे दूर असलेल्या भावंडांशी संपर्क साधणे सोपे झाले आहे. व्हिडिओ संभाषण, संदेश आणि दूरध्वनी यामुळे अंतर काही प्रमाणात कमी करता येते. परंतु तंत्रज्ञान हे नात्याचा पर्याय नाही; ते नाते जपण्याचे साधन आहे. सामाजिक माध्यमांवर एकमेकांसोबतचे छायाचित्र प्रसिद्ध करणे किंवा शुभेच्छा देणे सुंदर आहे; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे प्रत्यक्ष आयुष्यात एकमेकांसाठी उपलब्ध असणे. एखाद्या भावंडाच्या यशावेळी मनापासून आनंद व्यक्त करणे आणि अपयशाच्या वेळी त्याला कमी लेखण्याऐवजी धीर देणे यामुळे नाते अधिक अर्थपूर्ण होते. सार्वजनिक प्रदर्शनापेक्षा खासगी आपुलकी अधिक मौल्यवान असते.

बहिण-भावाच्या नात्यातील आठवणी हा एक वेगळाच भावनिक ठेवा असतो. घरातील जुन्या वस्तू, शाळेची छायाचित्रे, बालपणीचे खेळ, एकत्र केलेल्या सहली, पालकांनी दिलेल्या सूचना, छोट्या कारणांवरून झालेले वाद आणि नंतर झालेली मैत्री या सर्व गोष्टी काळ पुढे गेल्यानंतर अमूल्य वाटू लागतात. बालपणी ज्यांच्यासोबत वेळ घालवणे अगदी स्वाभाविक वाटत होते, त्याच क्षणांची पुढे आठवण येते. म्हणूनच भावंडांनी केवळ जुन्या आठवणी जपण्यापेक्षा नव्या आठवणीही निर्माण कराव्यात. एकत्र वेळ घालवणे, कुटुंबीयांसोबत भेटणे आणि परस्परांच्या आयुष्यात सहभागी राहणे यामुळे नाते सतत नव्याने फुलत राहते.

या नात्यात क्षमाशीलतेचे महत्त्वही मोठे आहे. भावंडे जवळची असल्यामुळे एकमेकांकडून अपेक्षाही मोठ्या असतात. त्यामुळे कधी शब्द लागतात, गैरसमज होतात किंवा मन दुखावले जाते. परंतु प्रत्येक मतभेदाला कायमचा दुरावा बनू देणे योग्य नाही. नाते टिकवण्यासाठी कधी स्वतःची चूक मान्य करावी लागते, कधी माफी मागावी लागते आणि कधी समोरच्याला माफ करावे लागते. मीच बरोबर' या भूमिकेपेक्षा आपले नाते महत्त्वाचे आहे' ही भावना अधिक मोठी असली पाहिजे. नात्यातील प्रेम टिकवण्यासाठी अहंकाराला थोडे मागे ठेवावे लागते.

बहिण-भावाचे नाते आपल्याला माणूस म्हणून अधिक संवेदनशील बनवते. दुसऱ्याची काळजी घेणे, त्याच्या भावनांचा आदर करणे, त्याच्या आनंदात सहभागी होणे आणि संकटात त्याला आधार देणे या मूल्यांची सुरुवात अनेकदा कुटुंबातील नात्यांपासूनच होते. म्हणूनच या नात्यातील प्रेम केवळ दोन व्यक्तींमध्ये मर्यादित राहत नाही; ते संपूर्ण कुटुंबाच्या वातावरणावर परिणाम करते. परस्पर सन्मान आणि समानतेवर आधारलेली भावंडे पुढे समाजातील इतर नात्यांकडेही अधिक संवेदनशीलतेने पाहू शकतात. त्यामुळे बहिण-भावाचे नाते हे केवळ वैयक्तिक नाते नसून मानवी मूल्यांची शाळाही आहे.

रक्षाबंधनाच्या दिवशी बहिणीने भावाच्या मनगटावर राखी बांधावी, भावाने बहिणीला प्रेमाने भेट द्यावी, एकमेकांना शुभेच्छा द्याव्यात; परंतु या बाह्य कृतींपेक्षा त्या मागील भावना अधिक महत्त्वाच्या आहेत. बहिणीच्या स्वप्नांना बळ देणे, भावाच्या संघर्षांना समजून घेणे, एकमेकांच्या निर्णयांचा आदर करणे, मतभेदांमध्ये संवाद साधणे आणि गरजेच्या वेळी निःस्वार्थपणे साथ देणे हा या नात्याचा खरा उत्सव आहे. नात्याचे सौंदर्य एका दिवसापुरते मर्यादित नसते. रक्षाबंधनाचा दिवस त्या नात्याची जाणीव अधिक तीव्र करून देतो; मात्र त्यातील प्रेम वर्षभर जगले गेले पाहिजे.

आजच्या काळात नात्यांमध्ये वाढणारा ताण, धावपळ आणि वैयक्तिक आयुष्याभोवती केंद्रित होत जाणारी जीवनशैली पाहता बहिण-भावाच्या नात्याची जपणूक अधिक आवश्यक आहे. भावंडे एकमेकांची स्पर्धक नसून सहप्रवासी असतात. एका भावंडाचे यश दुसऱ्याच्या अपयशाचे कारण नसते. उलट, एकमेकांच्या प्रगतीत आनंद मानणे आणि परस्परांना पुढे जाण्यास प्रोत्साहन देणे ही नात्याची खरी उंची आहे. तुलना, मत्सर आणि अहंकार यांना दूर ठेवून सहकार्य आणि आपुलकी स्वीकारली तर भावंडांचे नाते अधिक आनंददायी बनते.

शेवटी, बहिण-भावाचे नाते हे आयुष्याच्या प्रवासातील एक अनमोल सोबत आहे. बालपणी एकाच घराच्या छताखाली सुरू झालेला हा प्रवास पुढे वेगवेगळ्या दिशांनी जाऊ शकतो; परंतु मनातील आपलेपणाचा धागा तुटण्याची गरज नाही. काळ बदलतो, माणसे बदलतात, परिस्थिती बदलते आणि जबाबदाऱ्या वाढतात; तरीही बालपणीचा भाऊ आणि बालपणीची बहीण मनाच्या एका कोपऱ्यात कायम जिवंत राहतात. म्हणूनच २८ ऑगस्टच्या रक्षाबंधनानिमित्त राखीच्या धाग्यापेक्षा त्या धाग्याशी जोडलेले प्रेम अधिक महत्त्वाचे मानू या. एकमेकांच्या स्वातंत्र्याचा सन्मान, स्वप्नांना प्रोत्साहन, सुख-दुःखात साथ, मनमोकळा संवाद आणि आयुष्यभराचा विश्वास या मूल्यांनी बहिण-भावाचे नाते अधिक समृद्ध करू या. कारण शेवटी राखी मनगटावर बांधली जाते; पण तिचा खरा धागा मनामध्ये जुळलेला असतो. तो धागा प्रेमाचा, आठवणींचा आणि विश्वासाचा असतो-आणि म्हणूनच तो काळाच्या कोणत्याही अंतरापेक्षा अधिक मजबूत असतो.

- डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
ईमेल - लरसरींश.ारिक्षशपवीर५Sसारळश्र.लो

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# भिवंडी तालुक्यात एफएफएस ॲपद्वारे खत विक्री सुरळीत सुरू

## शेतकऱ्यांना घरबसल्या खत बुकिंगची सुविधा; क्यू. आर कोड दाखवून कृषी सेवा केंद्रातून खरेदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : केंद्र शासनाच्या Framework for Fertilizer Sale (एफ. एफ एस) पद्वारे भिवंडी तालुक्यात आजपासून खत विक्रीची प्रक्रिया सुरळीतपणे सुरू झाली आहे. या नव्या प्रणालीमुळे शेतकऱ्यांना घरबसल्या आवश्यक खताचे बुकिंग करता येणार असून, बुकिंगनंतर मिळणारा क्यू आर कोड निवडलेल्या कृषी सेवा केंद्रावर दाखवून खत खरेदी करता येणार आहे. खत विक्री आणि वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणणे, शेतकऱ्यांना




त्यांच्या गरजेनुसार खत उपलब्ध करून देणे तसेच संपूर्ण वितरण व्यवस्थेचे प्रभावी व्यवस्थापन करणे, हा एफ. एफ .एस प्रणालीचा प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे खत खरेदीसाठी शेतकऱ्यांचा अनावश्यक वेळ आणि त्रास कमी होण्यास मदत होणार आहे.एफ. एफ .एस . प्रणालीची अंमलबजावणी सुरळीत व्हावी यासाठी गुण नियंत्रण निरीक्षक विवेक दोंदे यांनी तालुक्यातील विविध कृषी सेवा केंद्रांना प्रत्यक्ष भेटी देऊन केंद्र चालक तसेच शेतकऱ्यांना पच्या वापराबाबत आणि क्यू आर कोडद्वारे खत खरेदी करण्याच्या प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. प्रणाली सुरू असताना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी त्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून आवश्यक दक्षता घेतली. दरम्यान, एफ. एफ. एस. प्रणाली सुरू करण्यापूर्वी कृषी सेवा केंद्र चालकांसह कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात आले आहे. ग्रामस्तरावरही कृषी विभागामार्फत या प्रणालीबाबत जनजागृती आणि प्रसिद्धी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना अडचण आल्यास तातडीने मार्गदर्शन मिळावे यासाठी संबंधित अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांकही उपलब्ध करून देण्यात आले आहेत. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रामेश्वर पाचे तसेच कृषी विकास अधिकारी मुनीर बाचोटीकर यांच्या मार्गदर्शनाखाली मोहीम अधिकारी महेश बनकर आणि जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक बालाजी शिंदे यांनीएफ. एफ. एस. प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक प्रशिक्षण व मार्गदर्शन केले.या प्रणालीमुळे भिवंडी तालुक्यात शेतकऱ्यांना सुलभ, पारदर्शक आणि व्यवस्थित खत वितरण व्यवस्था उपलब्ध होणार आहे. खत खरेदी करताना शेतकऱ्यांना कोणताही अनावश्यक त्रास होऊ नये, यासाठी कृषी विभागाकडून संपूर्ण प्रक्रियेवर सातत्याने देखरेख ठेवण्यात येत आहे.

# नारळी पौर्णिमा निमित्त श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेस पारंपरिक अलंकार परिधान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : नारळी पौर्णिमा निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेस आकर्षक, मनोहारी व पारंपरिक सुवर्ण अलंकारांनी सजविण्यात आले. या पारंपरिक अलंकारांमुळे श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेचे रूप अधिक विलोभनीय दिसून आले.

श्री विठ्ठलास पगडी, कौस्तुभ मणी, दंड पेट्या, मोत्याच्या कंठ्या, हिऱ्याचे कंगन जोड,तुळशीची माळ,जानवे, तोडे जोड,शिरपेच, मोत्याचा तुरा आदी पारंपरिक अलंकार परिधान करण्यात आले. तसेच, रुक्मिणी मातेस सोन्याचे मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, जवमणी पदक, चिंचपेटी तांबडी, जवळच्या माळा, लक्ष्मी हार, मोरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा आदी पारंपरिक अलंकार परिधान करण्यात आले. याबाबतची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांनी दिली.

# पीएच.डी. अधिछात्रवृत्ती (शैक्षणिक वर्ष २०२३ बाबत) संशोधक विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्यामार्फत अनुसूचित जातीतील संशोधक विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BNRF) योजना सन २०१३ पासून राबविण्यात येत आहे. सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र शासनाने सर्वंकष धोरण निश्चित केले आहे. सदर धोरणानुसार, दिनांक १ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी कायमस्वरूपी नोंदणी (Permanent Registration) झालेल्या अनुसूचित जातीतील संशोधक विद्यार्थ्यांकडून पीएच.डी. अधिछात्रवृत्ती शैक्षणिक वर्ष २०२३, २०२४ व २०२५ करिता दिनांक ०१ ऑगस्ट २०२६ पासून ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**वयोमर्यादेबाबत महत्त्वाची सूचना**

बार्टी, पुणे यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार पीएच.डी. अधिछात्रवृत्तीसाठी कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२३ करिता दिनांक ०१ जून २०२३ रोजी संशोधक विद्यार्थ्याचे वय ३५ वर्षांपेक्षा अधिक नसावे, अशी अट नमूद करण्यात आली होती. तथापि पीएच.डी अधिछात्रवृत्ती वर्ष २०२३ करिता वयोमर्यादा ४५ वर्ष करण्याचा निर्णय घेण्यात आला. दिनांक ०१ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी कायमस्वरूपी नोंदणी झालेल्या अनुसूचित जातीतील संशोधक विद्यार्थ्यांसाठी सदर वयोमर्यादेत शिथिलता देण्यात येत आहे.त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२३ करिता पीएच.डी. अधिछात्रवृत्तीच्या अर्जासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे करण्यात येत आहे.

सदर वयोमर्यादा शिथिलतेचा लाभ फक्त शैक्षणिक वर्ष २०२३ करिता दिनांक ०१ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत पीएच.डी.साठी कायमस्वरूपी नोंदणी झालेल्या अनुसूचित जातीतील संशोधक विद्यार्थ्यांना लागू राहील.

तरी पात्र संशोधक विद्यार्थ्यांनी वरील बाबींची नोंद घेऊन बार्टी, पुणे यांच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध मार्गदर्शक सूचनांचा अभ्यास करून दिनांक १५/०९/२०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करावा असे आवाहन मा.महासंचालक, बार्टी, पुणे यांनी केले आहे.

# बांधकाम कामगारांना राखी बांधून विद्यार्थिनींनी जपली माणुसकी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी : रक्षाबंधनाचा सण केवळ भाऊ-बहिणीच्या नात्यापुरता मर्यादित न ठेवता सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीचा संदेश देत जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळा, बोरोटी (खु.) येथील विद्यार्थिनींनी अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन साजरे केले.

शाळेच्या विद्यार्थिनींनी गावातील बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी जाऊन बांधकाम कामगार व संबंधितांना राखी बांधून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविला.



बांधकाम मिस्त्री नागप्पा पुजारी, रमेश पाटील, श्रीशैल कुंभार, युवराज पाटील, अमृत सनगुंदी तसेच घरमालक लक्ष्मीकांत पाटील यांना विद्यार्थिनींनी राखी बांधली. विद्यार्थिनींच्या या अनोख्या उपक्रमामुळे बांधकाम कामगार वर्गाचा आनंद द्विगुणित झाला. यावेळी अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. विद्यार्थिनींच्या या सामाजिक उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

यानंतर शाळेत सामूहिक रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सर्व विद्यार्थिनींनी शाळेतील विद्यार्थ्यांना राखी बांधली. विद्यार्थ्यांनी बहिणींना पेन, वह्या तसेच रोख रक्कम ओवाळणी म्हणून देऊन त्यांच्या आशीर्वाद घेतला. त्यामुळे शाळेतील वातावरण आनंदमय झाले.

विद्यार्थ्यांमध्ये प्रेम, बंधुभाव, सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीची भावना रुजावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमासाठी शरणप्पा फुलारी यांनी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापिका राजश्री तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली अंजली वाघमारे यांनी सहकार्य केले.

विद्यार्थिनींनी रक्षाबंधनाच्या माध्यमातून समाजातील कष्टकरी बांधवांशी आपलेपणाचे नाते जोडत 'राखीच्या धाग्यातून माणुसकीचा संदेश' दिला.

# धाराशिव पंचायत समितीच्या सहायक प्रशासन अधिकाऱ्यांना ५००० रुपये दंड




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : पंचायत समिती धाराशिव येथील जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी यांना अपीलार्थी यांच्या माहिती अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन माहिती अथवा माहिती संदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस उपलब्ध करून दिली नसल्यामुळे राज्य माहिती आयोग छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने(पाच हजार रुपये) रु.५०००/-इतका दंड केला आहे.

अपीलार्थी श्री.ज्ञानदेव गणपती कानडे रा.जवळे दु यांनी दिनांक २८.०६.२०२२ रोजी पंचायत समिती कार्यालय धाराशिव येथे माहितीचा अर्ज दिला होता, परंतु मागितलेली संपूर्ण माहिती न दिल्यामुळे अपीलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७(१)चा भंग करून आयोगाकडील निर्णय व निर्देशाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असून माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायद्याकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन पुरता नकारात्मक असल्याचा दिसून येत आहे असे आयोगाचे निष्कर्ष असल्यामुळे त्यांचे विरुद्ध अधिनियमातील कलम २०(१) व १९(८)कच्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारान्वये संबंधित जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी पंचायत समिती कार्यालय धाराशिव यांना प्रस्तुत प्रकरणी रु.५०००/- (अक्षरी- पाच हजार रुपये) इतका दंड करण्यात आला तसेच प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांच्या अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत प्रतिसाद देऊन माहिती अथवा माहिती संदर्भातील वस्तुस्थिती उपलब्ध न करून देण्यास जबाबदार जन माहिती अधिकारी यांची नावे निश्चित करून त्यांच्याकडून शास्तीची रक्कम वसूल करून ती लेखा-शीर्ष ००७०- इतर प्रशासनिक सेवा, ६०-इतर सेवा, ८००-इतर जमा रक्कम, १८-माहितीचा अधिकार ००७०-०१६-१ या लेखाशीर्षामध्ये जमा करण्याची जबाबदारी आयोगातर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद धाराशिव यांच्यावर निश्चित करण्यात येत आहे.

**खा. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते उद्घाटन तर मंत्री छगन भुजबळ अध्यक्षस्थानी**

# वनाधिपती विनायकदादा पाटील प्रतिष्ठानचा शनिवारी निफाडला शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्रातील ज्येष्ठ काँग्रेस नेते, माजी मंत्री, साहित्यप्रेमी व समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व म्हणून लौकिक मिळविलेले स्वर्गीय वनाधिपती विनायकदादा पाटील यांच्या कार्याची व विचारांची नव्या पिढीला ओळख व्हावी, या उद्देशाने निफाड येथे 'वनाधिपती विनायकदादा पाटील प्रतिष्ठान' स्थापन करण्यात आले आहे. या प्रतिष्ठानचा शुभारंभ शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार, निफाड येथे आयोजित करण्यात आला आहे.

संसदरत्न खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या शुभहस्ते प्रतिष्ठानचा शुभारंभ होणार असून, राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगनरावजी भुजबळ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित राहणार आहेत. दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भास्करराव भगरे, आमदार दिलीप बनकर व आमदार गोकुळ गिते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. सौ. हर्षाली पाटील मार्गदर्शन करणार आहेत.शेती, सहकार, शिक्षण आणि समाजसेवेचा वारसा स्वर्गीय विनायकदादा पाटील यांनी महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात आपल्या कार्याचा ठसा उमटविला. सहकार, शिक्षण, पर्यावरण आणि ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले. सरकारी वनशेतीला व्यापक स्वरूप देण्याच्या त्यांच्या कार्यामुळे त्यांची 'भारतातील सरकारी वनशेतीचे जनक' म्हणून ओळख निर्माण झाली.वनसंवर्धनासाठी त्यांनी केलेल्या भरीव कार्याची दखल घेत ज्येष्ठ साहित्यिक व कवी कुसुमाग्रज यांनी त्यांना प्रेमाने 'वनाधिपती' ही उपाधी दिली होती. पर्यावरण संवर्धनासोबतच शेती, सहकार, शिक्षण आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी मानले जाते.

विनायकदादांचे संपूर्ण जीवन शेती, सहकार, शिक्षण आणि समाजसेवा या चार स्तंभांवर उभे होते. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचावा, तसेच त्यांच्या सामाजिक व विकासात्मक योगदानाचे स्मरण कायम राहावे, या उद्देशाने प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली आहे.प्रतिष्ठानच्या शुभारंभ कार्यक्रमाला जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यप्रेमी, शेतकरी, सहकार क्षेत्रातील पदाधिकारी तसेच विनायकदादांवर प्रेम करणारे हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

ही माहिती पत्रकार परिषदेत प्रतिष्ठानचे अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, खजिनदार प्रा. मधुकर माळी, सचिव संदीप शिंदे, विश्वस्त राजाराम शेलार, अनिल पाटील कुंदे, राजाभाऊ राठी व शिवाजीराव ढेपले यांनी दिली.स्वर्गीय विनायकदादा पाटील यांच्या कार्यावर प्रेम करणाऱ्या जिल्ह्यातील सर्व मान्यवर, हितचिंतक, नागरिक व त्यांच्या विचारांना मानणाऱ्या कार्यकर्त्यांनी प्रतिष्ठानच्या शुभारंभ कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुंबई विभागीय राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर ठाणे जिल्ह्यात उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




ठाणे/केतन भोज : मुंबई विभागीय राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने २३ व २४ ऑगस्ट २०२६ रोजी मीरा गाव,घोडबंदर,ठाणे जिल्हा येथे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले.मुंबई विभागीय राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्याध्यक्ष शिवाजीराव नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर उत्साहपूर्ण व सकारात्मक वातावरणात संपन्न झाले.या प्रशिक्षण शिबिरास मुंबई विभागातील चार जिल्हाध्यक्ष,तालुकाध्यक्ष तसेच प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.शिबिरामध्ये मुंबई महानगरपालिकेची रुग्णालये आणि महानगरपालिकेच्या शाळा या महत्त्वपूर्ण विषयांवर विशेष प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात आले.आरोग्य आणि शिक्षण या जनतेच्या मूलभूत गरजांशी संबंधित विषयांवर जिल्हाध्यक्ष व तालुकाध्यक्षांनी आपले विचार मांडले.यावेळी मार्गदर्शन करताना मुंबई विभागीय राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्याध्यक्ष शिवाजीराव नलावडे यांनी सांगितले की,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दिवंगत नेते अजितदादा पवार यांना अभिप्रेत असलेल्या शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील कामांना प्राधान्य देणे गरजेचे आहे.जनतेची कामे करताना त्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असून,आरोग्य आणि शिक्षण हे त्यातील अत्यंत महत्त्वाचे विषय आहेत. प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपल्या विभागातील एक महानगरपालिका रुग्णालय आणि एक महानगरपालिका शाळा निवडून तेथील समस्या,उपलब्ध सुविधा व आवश्यक बाबींचा सखोल अभ्यास करावा.तसेच संबंधित ठिकाणी आवश्यक त्या सुधारणा घडवून आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत,असे आवाहन नलावडे यांनी केले.महानगरपालिका रुग्णालयांमध्ये आवश्यक असलेल्या आरोग्य सुविधा,औषधे,स्वच्छता व इतर मूलभूत सोयी तसेच महानगरपालिका शाळांमधील शैक्षणिक व भौतिक सुविधांकडे लक्ष देऊन जनहिताचे ठोस आणि परिणामकारक काम उभे करणे ही प्रत्येक पदाधिकाऱ्याची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.या दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन जिल्हाध्यक्ष इंद्रपाल सिंग,सुरेश भालेराव,अजय विचारे आणि वेंकटेश मानव यांनी केले होते.शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.शिबिराच्या माध्यमातून मुंबई विभागातील पदाधिकाऱ्यांना जनतेच्या मूलभूत प्रश्नांचा अभ्यास करून त्यावर प्रभावीपणे काम करण्यासाठी दिशा व मार्गदर्शन मिळाले.आगामी काळात आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांना प्राधान्य देत जनतेच्या हितासाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.



# दुधनी बाजार समितीच्या सभापतीपदी सिद्धाराम बाके, उपसभपती निगाप्पा पुजारी यांची निवड

## अखेर आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली झाली निवड; निवडणूक निर्णय अधिकारी ए.ए. गावडे यांनी पाहिले काम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट (प्रतिनिधी) तालुक्यातील दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदाकरिता भाजपाकडून सिद्धाराम बाके तर शिवसेना शिंदे गटाकडून शिवानंद पाटील यांच्यात व उपसभापती करिता भाजपाकडून लिंगप्पा पुजारी तर शिवसेना शिंदे गटाकडून इराणा धसाडे यांच्यात गुप्त पद्धतीने मतदान घेण्यात आले यामध्ये भाजपाचे नूतन सभापती म्हणून सिद्धाराम बाके तर उपसभापती म्हणून निंगाप्पा पुजारी यांची १३ विरुद्ध ५ मतांनी निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ए. ए. गावडे यांनी काम पाहिले.

या निवडीनंतर नूतन सभापती व उपसभापती यांचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी पुष्पहार घालून अभिनंदन केले. गुलालाची उधळण करत व फटाक्यांची आतषबाजी करत कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. याप्रसंगी भाजपाचे असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उप-स्थित होते.

यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, उपनगराध्यक्ष बंटी राठोड, सोलापूर बाजार समितीचे उपसभापती सुनील कळके, पंचायत समितीचे उपसभापती सागर कल्याणशेट्टी, दुधनी बाजार समितीचे संचालक देवेंद्र बिराजदार, सातलिंगप्पा परमशेट्टी, मल्लिकार्जुन झळके, वाहिदपाशा शेख, विश्वनाथ नागुर, मोतीराम राठोड, सुवर्णा मचाले, अश्विनी सालेगाव, सिद्धाराम तोलनुरे, विश्वनाथ कोगनूर, रमेश पाटील यांच्यासह अक्कलकोट मंडल अध्यक्ष प्रदीप पाटील, अमोल हिप्परगे, सुनील खेड, मैंदर्गी नगराध्यक्ष अंजली बाजारमठ, जिल्हा परिषद सदस्य सिद्धाराम शिवमूर्ती, विकास बुला, शिवानी स्वामी, नगरसेवक यशवंत धोंगडे, महेश हिंडोळे, अविनाश मडीखांबे,

महेश इंगळे, देविदास कवटगी, कांतु धनशेट्टी, सद्दाम शेरीकर, नाविक डांगे, नन्नूभाई कोरबू, पंचायत समिती सदस्य विनोद मोरे, विलास गव्हाणे, आप्पासाहेब कवडे, महेश पाटील, अतुल मेळकुंदे, शंकर भांजी, बसवराज हौदे यांच्यासह असंख्य भाजपा कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सन २०२३ मध्ये झालेल्या दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीने बाजार समितीवर सत्ता काबीज केली. तर माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे यांच्या पॅनलला केवळ ६ जागांवर समाधान मानावे लागले होते. त्यावेळी अप्पू परमशेट्टी यांची सभापती पदी तर उपसभापती सिद्धाराम बाके यांची निवड करण्यात आली होती. गत पंधरा दिवसा खाली सभापती व उपसभापती यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने ही दोन्ही पदे रिक्त झाली होती. यामुळे नूतन सभापती व उपसभापती पदी कोणाची वर्णी लागणार याकडे तालुक्याचे लक्ष लागून राहिले होते. अखेर आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली सभापती म्हणून सिद्धाराम बाके तर उपसभापती म्हणून लिंगप्पा पुजारी यांची निवड करण्यात आली आहे.

# महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले, प्रशासनाचे चक्क दुर्लक्ष

**दुधाने तोंड वर काढले तर साखर व इतर साहित्यामुळे सर्वसामान्य जनता महागाईत होरपळली आहे**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग या ऐतिहासिक शहरासह परिसरातील गोरगरीब कुटुंबातील अनेक नागरिक आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी दररोज शहरात कामाच्या शोधात ये-जा करतात. कोणी शेतात, कोणी रानात, तर कोणी शहरातील विविध ठिकाणी मजुरी करून आपल्या कुटुंबाचा गाडा चालवित आहे. मात्र दिवसेंदिवस वाढत असलेल्या महागाईमुळे या सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक अडचणी मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत.

महागाईने अक्षरशः सर्वसामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले असून, उत्पन्नाच्या तुलनेत खर्च वाढत असल्याने घरखर्च भागविणे कठीण झाले आहे. खाद्यतेलाचे भाव वाढले, कडधान्यांचे दर वाढले, भाजीपाल्याचे दर वाढले, दुधाच्या दराने तोंड वर काढले आणि आता साखरेच्या दर वाढीने ही सामान्य नागरिकांच्या खिशाला कात्री लावली आहे.जनता त्या महागाईच्या दुनियेत होरपळून जात आहे.

दररोज कष्ट करून मिळणाऱ्या उत्पन्नातून घरातील अन्नधान्य, शिक्षण, आरोग्य, प्रवास आणि इतर आवश्यक खर्च भागविताना नागरिकांची मोठी दमछाक होत आहे. सण-उत्सवांच्या काळात तर खर्च आणखी वाढतो. दिवाळीसह विविध सण जवळ येत असताना जीवनावश्यक वस्तूंच्या किमती कमी होण्याऐवजी वाढत असल्याने गोरगरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे.

महागाईची ही झळ केवळ शहरापुरती मर्यादित नसून ग्रामीण भागातील नागरिकांनाही मोठ्या प्रमाणात बसत आहे. शेतमजूर, रोजंदारी कामगार, छोटे व्यावसायिक आणि अल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबांना वाढत्या दरांचा सर्वाधिक फटका बसत आहे. त्यामुळे शासनाने जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

महागाई कमी करण्यासाठी शासन दरबारी मोर्चे आंदोलने आणि विविध माध्यमातून जण आंदोलन उभारण्याची गरज असल्याचे मत काही नागरिकांनी व्यक्त केले आहे प्रशासनाने या गोरगरीब जनतेच्या हिताचा विचार करून अवश्यक त्या उपयोजना करावे जेणेकरून सर्वसामान्य नागरिकांच्या कुटुंबाच्या उदार निर्वाह सन्मानाने करता येईल.

वाढत्या महागाई कडे प्रशासनाने दाबेली लक्ष देऊन सर्वसामान्य नागरिकांना दिलासा व न्याय द्यावा आणि त्याच्या खिशाला आणखी काही खात्री लागणार नाही यासाठी तातडीने पावले उचलावीत अशी भावना नागरिकांत होत आहे.




# अक्कलकोटमध्ये जश्ने ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त भव्य रक्तदान व मोफत आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट :सर्व जगाला शांतीचे संदेश देणारे शांतिदूत प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर जयंती निम्मित अक्कलकोट तालुका युवक मुस्लिम समाजाच्या वतीने बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी नगरपरिषद उर्दू शाळा क्र.२ कारंजा चौक, अक्कलकोट येथे भव्य रक्तदान शिबिर तसेच सोलापूर कॅन्सर सेंटर हॉस्पिटलतर्फे मोफत आरोग्य व कर्करोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या दोन्ही सामाजिक उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**१७३ रक्तदात्यांचे रक्तदान**

या रक्तदान शिबिरात तब्बल १७३ रक्तदात्यांनी रक्तदान करून मानवतेच्या सेवेत मोलाचे योगदान दिले. विशेष म्हणजे अक्कलकोट शहरात बंदोबस्तासाठी सोलापूर येथून आलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांनीही सामाजिक बांधिलकी जपत या उपक्रमात सहभाग घेतला यावेळी सोलापूर येथील पाच ते सहा पोलिस कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले.

पोलिसांच्या या सहभागाचे उपस्थितांकडून विशेष कौतुक करण्यात आले.

आरोग्य व कर्करोग निदान शिबिरात ६५ रुग्णांची तपासणी करण्यात आली शिबिरासाठी डॉ. तौसीफ मुल्ला, नर्सिंग इन्चार्ज इलाही पठाण, असिस्टंट ॲडमिन ऑफिसर विक्रमसिंह पाटोले, प्रो. नजीर मुजावर, नर्सिंग स्टाफ अमर भगारे, नर्सिंग स्टाफ निकिता पाटले तसेच मेडिकल स्टाफ मॅझ पटेल यांनी सेवा बजावली.

रक्तदान शिबिरासाठी डॉ. गलीअल, सादिक भाई मुजावर तसेच सिद्धेश्वर रक्तपेढीच्या टीमने मोलाचे सहकार्य केले.

या सामाजिक उपक्रमास अक्कलकोट शहरातील दातापीर दर्ग्याचे सय्यद शाह दातापीर साहेब, सय्यद शाह मस्तुर साहेब, सद्दाम शेरीकर, नन्नू कोरबू,मुस्तफा बाळोरगी, रऊफ पिरजादे साहेब, अजित शेख सर, इरफान दावना, समीर शेख,नाविद डांगे, शिकुर शेख, मौलाना इब्राहिम,मौलाना सरफराज, ॲड. फारिया टिनवाला,शबाब शेख,अविनाश मढीखांबे,राहुल ढोबळे,आजम शेखजी,भैय्या नाईकवाडी व पत्रकार अशपाक मुल्ला,पत्रकार स्वामीराव गायकवाड,पत्रकार रमेश भंडारी आदी मान्यवरांनी भेट देऊन रक्तदान व आरोग्य शिबिराची पाहणी केली. शिबिराचे उत्कृष्ट नियोजन आणि समाजोपयोगी उपक्रमाचे मान्यवरांनी कौतुक केले.

ईद-ए-मिलादुन्नबीचा संदेश केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता मानवसेवा, बंधुभाव आणि सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचविण्याचा आदर्श या उपक्रमातून देण्यात आला.

शिबिर यशस्वी करण्यासाठी युसुफ कन्नी, आयुब मल्लभारी, सैपन शेख(राणा), नूरू जवळगेकर, बाबा शेख, साकिब खिस्तके, अशरफ गोलंदाज, मौला मुल्ला, मुस्तकीम सय्यद, बुडन चाबूकसवार, शब्बीर सुभेदार, इलियास शेख, फिरोज फरास, अकिब बागवान यांनी सहकार्य केले.

तसेच रशीद खिस्तके व सोहेल फरास यांनी शिबिराच्या नियोजनासाठी विशेष मोलाचे कार्य केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचे, वैद्यकीय पथकाचे, रक्तपेढीच्या टीमचे, नगरपालिका कर्मचाऱ्यांचे, शाळेचे मुख्याध्यापकांचे, पोलिस बांधवांचे तसेच १७३ रक्तदात्यांचे आयोजकांच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास यांनी शेवटी सर्वांचे आभार मानले.

**हजरत मोहम्मद पैगंबरांनी संपूर्ण मानवजातीला दिलेल्या इन्सानियत, प्रेम, करुणा,बंधुभाव आणि मानवसेवेचा संदेश आम्ही केवळ शब्दांत नाही, तर रक्तदान आणि आरोग्यसेवेच्या माध्यमातून कृतीत उतरविला.**
**१७३ रक्तदात्यांचे रक्तदान व ६५ रुग्णांची तपासणी**
**हीच पैगंबरांच्या मानवतेच्या शिकवणीला खरी आदरांजली!**
**धर्म वेगळे असले तरी माणुसकी एकच**
**आणि माणुसकीपेक्षा मोठी कोणतीही सेवा नाही!**
**सोहेल फरास सामाजिक कार्यकर्ते, अक्कलकोट**

